गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## कृषी विपणन अधोसंरचना योजनेला तातडीने निधी द्यावा

### खासदार डॉ. कल्याण काळे यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - छत्रपती संभाजीनगरचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शिवराज सिंह चौहान (केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री) यांची भेट घेऊन एकीकृत कृषी विपणन योजना अंतर्गत कृषी विपणन अधोसंरचना () उप-योजना तातडीने पुन्हा सुरू करण्याची आणि त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, उप-योजना ही देशातील शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था (), सहकारी संस्था तसेच ग्रामीण उद्योजकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना ठरली आहे. मात्र, १० जून २०२५ रोजी केंद्र सरकारने या योजनेचा निधी संपल्यामुळे ती तात्पुरती स्थगित केली आहे, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

या योजनेअंतर्गत देशातील विविध राज्यांमध्ये ग्रामीण गोदामे, कोल्ड स्टोरेज, राइस मिल्स, ग्रेडिंग युनिट्स, वेटब्रिज आदी आधुनिक कृषी अधोसंरचना उभारण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे ₹५०० कोटींपेक्षा अधिक अनुदान ३,५०० हून अधिक लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले आहे. यामुळे पिकांनंतरचे नुकसान कमी होऊन शेतकऱ्यांना चांगल्या बाजारपेठेच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.



डॉ. काळे यांनी याकडेही लक्ष वेधले की, योजना अचानक थांबल्यामुळे अनेक प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत. अनेक शेतकरी व उद्योजकांनी अनुदानाच्या अपेक्षेने बँक कर्ज घेऊन प्रकल्प सुरू केले आहेत. त्यामुळे या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि शेतकऱ्यांच्या विश्वासावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर त्यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत: उप-योजनेसाठी तातडीने अतिरिक्त निधी मंजूर करावा प्रलंबित प्रस्तावांची प्रक्रिया आणि नवीन प्रकल्पांना मंजुरी त्वरित सुरू करावी आवश्यक असल्यास पूरक अर्थसंकल्प अथवा आकस्मिक निधीतून आर्थिक तरतूद करावी डॉ. कल्याण काळे यांनी विश्वास व्यक्त केला की, मंत्री महोदयांच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे ही महत्त्वपूर्ण योजना पुन्हा सुरू होऊन देशातील शेतकऱ्यांना आणि ग्रामीण उद्योजकांना मोठा दिलासा मिळेल.

## मोती तलाव परिसरात तथागत गौतम बुद्ध स्मारकासाठी जागा निश्चित! लवकरच कामाला गती मिळणार

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील ऐतिहासिक मोती तलाव परिसरात तथागत गौतम बुद्ध स्मारक मूर्ती बसविण्याच्या दृष्टीने आज, दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी प्रशासकीय व पदाधिकारी स्तरावर संयुक्त स्थळ पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान स्मारकासाठीची जागा निश्चित करण्यात आली असून, लवकरच पुढील नियोजनबद्ध कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.

याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त मा. सौ. आशिमा मित्तल, जालना शहराच्या महापौर मा. सौ. वंदना अरुण मगरे आणि उपमहापौर मा. श्री. राजेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालणाऱ्या या स्मारकासाठी योग्य जागेची निवड करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मोती तलाव परिसरातील उपलब्ध जागेची तांत्रिक आणि भौगोलिक पाहणी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष श्री. सुधाकर निकाळजे, महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री. स. सऊद, कनिष्ठ लिपिक श्री. आनंद अंभोरे, मनपाचे वास्तुविशारद (आर्किटेक्ट) श्री. बनसोड, स्मारक समितीचे सदस्य श्री. धर्मा खिल्लारे यांच्यासह इतर मान्यवर व समिती सदस्य उपस्थित होते.



जिल्हाधिकारी तथा आयुक्त सौ. आशिमा मित्तल यांनी तथागत गौतम बुद्ध मूर्ती परिसराच्या नियोजनाबाबत तांत्रिक सूचना दिल्या, तर महापौर सौ. वंदना मगरे यांनी या कामासाठी आवश्यक असलेला निधी आणि प्रशासकीय पाठपुरावा प्राधान्याने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीचे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन आणि स्मारक समिती एकत्रितपणे प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## एलपीजी गॅसचा तुटवडा; पुरवठा सुरळीत न झाल्यास ऑटो रिक्षा चालक-मालकांचा चक्का जाम आंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरातील ऑटो रिक्षा चालक-मालकांच्या विविध मागण्यांसंदर्भात मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ऑटो रिक्षा चालक-मालक संघटना, संयुक्त कृती समिती महाराष्ट्र (शाखा : जालना) यांच्या वतीने आज जिल्हाधिकारी तथा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

एलपीजी गॅसचा नियमित पुरवठा होत नसल्याने आणि रिक्षा व्यवसाय गंभीर अडचणीत आल्याने मागण्या तातडीने मान्य न झाल्यास बेमुदत रिक्षा बंद व चक्का जाम आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या देशातील विविध घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात एलपीजी गॅस पंपांवर चालकांकडून मनमानी दर आकारले जात आहेत, तसेच गॅसचा पुरवठा नियमित व पुरेशा प्रमाणात होत नसल्यामुळे कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. याचा थेट परिणाम ऑटो रिक्षा चालकांच्या रोजीरोटीवर होत असून अनेक चालकांवर उपजीविकेचे संकट ओढवले आहे. रिक्षा चालकांचे म्हणणे आहे की, आधीच वाढती महागाई, इंधन खर्च, दैनंदिन देखभाल आणि उत्पन्नातील घट यामुळे चालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच एलपीजी गॅस मिळण्यात होणारा विलंब आणि दरांबाबतचा गोंधळ यामुळे शहरातील रिक्षा वाहतूक विस्कळीत होत आहे. यामुळे शालेय विद्यार्थी वाहतूक आणि सर्वसामान्य नागरिकांची प्रवास व्यवस्था देखील बाधित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय, संघटनेने शहरात विनापरवाना ई-रिक्षांची वाढती संख्या हा देखील गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. अशा अनधिकृत वाहनांमुळे नियमित परवाना धारक रिक्षा चालकांचा व्यवसाय मंदावला असून, अधिकृत रिक्षा चालकांवर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या निवेदनावर चालक-मालक संघर्ष समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी सचिव सुभाष चव्हाण उपाध्यक्ष संतोष शेळके कमलेश काथवटे सय्यद रहीम गणेश मस्के दत्तात्रेय शिकारे संजय भालेराव शेख गफ्फर शेख शेख आयुब गणेश चौधरी प्रकाश चव्हाण यौसेफ जगधणे राम पंडितराव मस्के विशाल घुमरे अनिल घडलिगे आदींच्या साक्षर आहेत

## मंत्रिमंडळ बैठकीत सहा निर्णय; दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ

**मुंबई** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार (१ एप्रिल) रोजी राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत मंत्रिमंडळाने सहा महत्त्वपूर्ण निर्णयांवर शिक्कामोर्तब केले. यामध्ये साकळाई उपसा सिंचन योजना, राज्य नदी पुनरुज्जीवर प्राधिकरण, अमरावतीमधील क्रीडा संकुल, अनुसूचित जाती उपवर्गीकरण निवेदन आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबतच्या निर्णयांचा समावेश आहे. राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ.

युवा आदर्श

### चुकभूल...

**बायकोला बोले मी**
**तू गं गुलाबाचं फूल**
**गुलाबशब्द विसरलो**
**एवढीचं झाली भूल**
**पुढचं काय विचारता**
**थंडा थंडा कूल कूल**
**स्वयंपाक पाणी बंद**
**सांभाळी मीचं चूल**
**मॅडम गेली खरेदीला**
**माझ्याचं गळ्यां मूल**
**क्रेडिट कार्ड लिमीट**
**क्षणांत झाली फुल्ल**
**सायंकाळी सासर घरी**
**आम्ही सर्द कूलकूल**
**खरा एप्रिल फूल मी**
**आमचीचं दांडी गूल**
**ती महिषासुर मर्दिनी**
**कायम उगारी त्रिशूल**
**मुर्ख पणाची किंमत**
**व्याजा सकट वसूल**
**महागात पडली अति**
**एवढी छोटीशी भूल**
**मुर्ख शिरोमणी असा**
**मिळणार न बिलकुल**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## भाजपाचा स्थापना दिवस दिवाळी सणाप्रमाणे साजरा करा - प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे

### मोहिमेच्या माध्यमातून मतदान यादी अद्यावत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे - भास्कर दानवे






**जालना । प्रतिनिधी** - भाजपाचा स्थापना दिवस ६ एप्रिल दिवाळी सणाप्रमाणे भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी साजरा करण्याचे आवाहन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे यांनी भाजपा जालना ग्रामीण व जालना महानगर च्या जिल्हा बैठकीत पदाधिकारी यांना केले. आज दि. ०१ एप्रिल रोजी भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिवस तसेच (मतदार यादी पुनरावलोकन) मोहिमेच्या अनुषंगाने मार्गदर्शन व आढावा घेण्यासाठी आज दि. ०१ एप्रिल रोजी भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली, यावेळी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक आण्णा पांगारकर, विमलताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, सुनील पवार, गोविंद ढेंबरे, वसंत शिंदे, रमेश भापकर, अरुणाताई जाधव, अमोल कारंजेकर, युवा नेते अक्षय गोरंटयाल, नगरसेवक महावीर ढक्का यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना संजयजी कौडगे म्हणाले की, भाजपा स्थापना दिवस हा केवळ उत्सव नसून कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी दिवस आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने गावागावात पोहोचून पक्षाची विचारधारा व सरकारची कामगिरी जनतेपर्यंत पोहोचवावी. ६ एप्रिल हा दिवस भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिवाळी सणाप्रमाणे साजरा करावा, तसेच मोहिमेच्या माध्यमातून मतदार यादी अचूक व अद्ययावत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी. बैठकीत ६ एप्रिल स्थापना दिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती देण्यात आली. त्यानुसार ५ ते ७ एप्रिल दरम्यान सर्व कार्यालयांवर सजावट व रोषणाई करण्यात यावी, ६ एप्रिल रोजी ध्वजवंदन, मिठाई वाटप तसेच पक्षाचा इतिहास व कार्य याबाबत माहिती देणारे कार्यक्रम आयोजित करावेत, तसेच ५ ते १२ एप्रिल दरम्यान कार्यकर्त्यांनी आपल्या घरांवर पक्षाचा झेंडा लावून सोशल मीडियावर प्रचार करावा, ८ व ९ एप्रिल रोजी मंडळस्तरावर सक्रिय कार्यकर्ता संमेलन घ्यावे, तर ७ ते १२ एप्रिल या कालावधीत गाव व वस्ती स्तरावर स्वच्छता अभियान, जेष्ठ मान्यवरांचा सन्मान, तसेच शासकीय योजनांबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

यावेळी आ.नारायणभाऊ कुचे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लक्षात घेता सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज राहून संघटन मजबूत करण्यावर भर द्यावा. भाजपाला या निवडणुकांमध्ये यश मिळवून देण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या स्तरावर सक्रीय राहून पक्षाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी असून, यासाठी घरोघरी संपर्क साधून जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी भास्कर दानवे यांनीही कार्यकर्त्यांना संबोधित करताना (मतदार यादी पुनरावलोकन) मोहिमेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, निवडणुकांच्या दृष्टीने अचूक व अद्ययावत मतदार यादी ही अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे या मोहिमेत प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने व सक्रीय सहभाग नोंदवून नवीन मतदारांची नोंदणी, नावांमधील त्रुटी दुरुस्ती तसेच अपात्र नावे वगळणे यासाठी प्रयत्न करावेत. या माध्यमातून पक्ष संघटन अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सुशीलाताई दानवे, सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलिये, नारायण पवार, गणेश खवणे, शिवाजी बोबडे, शंकर लहामगे, परीक्षित शिंदे, महेश निकम, सुनील खरे, संजय डोंगरे, अमोल धानुरे, भगवान मात्रे, विक्रम उफाड, गजानन नागवे, देविदास देशमुख, बाबासाहेब कोलते, शुभांगी देशपांडे, सकुबाई पणबिसरे, सोमेश काबलिये, अनिल सरकटे, सतीश केळकर, अर्जुन गेही, वीरेंद्रकुमार धोका, संतोष माधोवाले, विक्रांत ढक्का, कल्याण भदनेकर, पदमा मानधानी, सिद्धेश्वर हजबे, बाबुराव भवर, अलोक सरवडीकर, अजित मानधानी, गुलाब पानबिसरे, रोहित खोडवे, मनोजकुमार जोशी, रोहित भुरेवाल, आकाश देशमाने, मनोज इंगळे, निलेश गोर्डे, विकास कदम, आनंद वाघमारे, विष्णू डोंगरे, योगेश शिमगे, अक्षय राजगिरी, राजाराम जाधव, मुकेश चव्हाण, नारायण मोहिते, कैलास मोहिते, बद्रीनाथ वाघ, सतीश निर्वळ, राजु साळवे, एकनाथ मोरे, दिपक ठाकूर, कल्याण काळे, संपत टकले आदींची उपस्थिती होती.

# ट्रम्पशाही विरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हुकूमशाही आणि युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जग वैतागले आहे. आपल्या हेकेखोरापणामुळे संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांच्यावर जगभरातील जनता वैतागली आहे कारण त्यांनी ज्याप्रकारे इराणवर हल्ला करून संपूर्ण जगाला वेठीस धरले ते कोणालाही आवडले नाही. ट्रम्प यांच्या हुकूमशाही वृत्तीला आता त्यांच्या देशातील जनताही वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने दीड वर्षापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. कोणताही विचार न करता इराणवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेत लाखो लोक रस्त्यांवर उतरले अमेरिकेचा राष्ट्रध्वज उलटा करून नागरिकांनी ट्रम्प यांचा अनोख्या पद्धतीने निषेध केला. या आंदोलनाला आंदोलनकर्त्यांनी नो किंग्ज असे नाव दिले. आम्हाला राजा नको तर लोकशाही मानणारा राष्ट्राध्यक्ष हवा जो लोकशाहिवृत्तीने देशाचा कारभार करेल अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिले. ट्रम्प यांची छबी विदुषकी रूपात दाखवून डोनाल्ड ट्रम्प चालते व्हा ! अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. या आंदोलनात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात महिलांची संख्याही लक्षणीय होती. ट्रम्प यांनी कोणताही मागचा पुढचा विचार न करता इराणवर हल्ला केला. खामेनी यांची हत्या करून दोन चार दिवसात इराणवर सहज विजय मिळवू अशा थाटात इराणवर हल्ला करणाऱ्या ट्रम्प यांना महिना उलटून गेला तरी इराणवर विजय मिळवता आला नाही. इराणला शरण आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ट्रम्प यांच्यावरच आता युद्धातून माघार घेण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांच्यामुळे संपूर्ण जगात अमेरिकेची नाचक्की होत आहे ही बाब अमेरिकेच्या जनतेला आवडली नाही म्हणूनच ते ट्रम्प यांच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरत आहे अर्थात ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन लोक रस्त्यावर उतरण्याची ही पहिलीच वेळ नाही. वर्षभरापूर्वी स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली होती. त्या आंदोलनाला आंदोलकांनी गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले होते. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनातही लाखो नागरिक रस्त्यावर जमले होते. त्यावेळी सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला होता. ते आंदोलन शांततेत पार पडले तरी त्या आंदोलनातही आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला होता. त्याआधीही अमेरिकन लोकांनी ट्रम्प यांच्याविरोधात रस्त्यावर उतरून असेच आंदोलन केले होते त्या आंदोलनाला हँडस ऑफ असे नाव दिले होते. त्या आंदोलनातही लोकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त करणाऱ्या घोषणा दिल्या होत्या. आताचे आंदोलनही त्याच धर्तीवर शांततेत पार पडत असले तरी लोक ट्रम्प यांच्या विरोधात तितकाच रोष व्यक्त करत आहेत. या आंदोलनाविषयी सांगताना आंदोलनकर्ते म्हणतात आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे आंदोलनकर्ते सांगत आहेत. या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील हे आंदोलनही शांततेत पार पडत असल्याने कोणालाही अटक करण्यात आले नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे. ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीला इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले याचा परिणाम जितका जगावर झाला तितकाच तो अमेरिकेवर देखील झाला. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती निर्माण झाली. ट्रम्प यांनी हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत. आता तर इराणवर हल्ला करून ट्रम्प यांनी अमेरिकन जनतेला महागाईच्या खाईत लोटले. ट्रम्प यांच्या या सर्व निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

### सुराज्य अभियानाद्वारे मागणी !


# ‘वृक्ष संजीवनी’चा केवळ ‘इव्हेंट’ नको, तर च्या आदेशानुसार

## झाडांचा गळा आवळणाऱ्या कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करा!

**मुंबई । प्रतिनिधी** - शहरातील २९.७५ लाख वृक्षांच्या रक्षणासाठी मुंबई महानगरपालिकेने १ एप्रिल २०२६ यादिवशी वृक्ष संजीवनी अभियान जाहीर केले आहे. हा केवळ एक दिवसाचा ‘वरवरचा उपचार’ असून प्रशासन याकडे केवळ एक ‘इव्हेंट’ म्हणून पाहत आहे का ? वृक्षांभोवतीचे काँक्रिट काढणे आणि खिळेमुक्त करणे ही कोणतीही ऐच्छिक सेवा नसून, माननीय नॅशनल ग्रीन ट्रिब्युनलच्या आदेशानुसार करावयाची अनिवार्य कायदेशीर कार्यवाही आहे. झाडांवर हजारो खिळे ठोकून जाहिराती लावणे आणि बुंध्यापर्यंत काँक्रिट ओतून त्यांचा गळा आवळणे आणि नैसर्गिक विकास रोखणे, हा महाराष्ट्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ सह राष्ट्रीय हरित लवादाच्या () स्पष्ट आदेशांचा थेट अवमान आहे. या गंभीर उल्लंघनांकडे डोळेझाक करून केवळ जनजागृतीचे कार्यक्रम राबवण्यापेक्षा, दोषींवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी हिंदु जनजागृती समितीच्या ‘सुराज्य अभियाना’ने केली आहे.

या संदर्भात जळगाव आणि सातारा जिल्हा प्रशासनाला आधीच विशेष निवेदने देण्यात आली असून नागपूरसह मुंबई महापालिकेचे महापौर आणि पालिका आयुक्त यांनाही निवेदन देण्यात आले. राज्यातील स्थिती अत्यंत भयावह असून, केवळ मुंबईतच गेल्या वर्षभरात झाडांवरून १७.४३ किलो खिळे आणि १,४६० बेकायदेशीर जाहिरात फलक काढले गेले आहेत. वृक्षांभोवतीची १ मीटर जागा कच्ची म्हणजेच ‘अनपेव्हड’ ठेवण्याचे उच्च न्यायालयाचेही निर्देश असताना, विकास कामात हजारो झाडांभोवती सिमेंटचे थर ओतले जातात तरी कसे ? इतक्या मोठ्या प्रमाणावर वृक्षसंपदा संकटात सापडली असताना, जाहिरातदारावर किंवा कंत्राटदारावर प्रशासन गुन्हा का दाखल करत नाही ?, ही चिंतेची बाब आहे. झाडांच्या मुळांना प्राणवायू मिळणे बंद झाल्यामुळे ती कमकुवत होऊन कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे, ज्याला पूर्णपणे प्रशासकीय निष्काळजीपणा जबाबदार आहे.

आमच्या मागण्यांमध्ये ‘ ’ या तत्त्वानुसार झाडांभोवतीचे काँक्रिट दोषी कंत्राटदारांच्याच स्वखर्चाने काढले जावे. अशा कंत्राटदारांना नुसती नोटिस न देता तातडीने ‘ब्लॅकलिस्ट’ करण्यात यावे. सरकारी निविदेतच झाडांभोवती जागा सोडण्याची अट अनिवार्य असावी. याचे उल्लंघन झाल्यास कंत्राटदाराची देयके रोखली जावीत. ‘वृक्ष संजीवनी’ सारखी मोहीम केवळ एका शहरापुरती मर्यादित न ठेवता, ती संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्य सरकारने तातडीने आदेश जारी करावेत. प्रशासनाने केवळ एक दिवसाचा ‘इव्हेंट’ न करता कायद्याची कडक अंमलबजावणी करावी. संपूर्ण महाराष्ट्रात वृक्षांना मोकळा श्वास घेता येईल, अशी कायमस्वरूपी कायदेशीर यंत्रणा निर्माण करावी. जोपर्यंत नियम मोडणाऱ्या व्यावसायिक संस्था आणि कंत्राटदारांवर कायद्याचा धाक निर्माण होत नाही, तोपर्यंत ही वृक्षसंपदा सुरक्षित होणार नाही, अशी भूमिका सुराज्य अभियानाचे समन्वयक श्री. अभिजित मुरकटे यांनी मांडली आहे.



# हनुमान जयंती आणि मारुतीची उपासना

शक्ती, भक्ती, कला, चातुर्य आणि बुद्धीमत्ता यांनी श्रेष्ठ असूनही प्रभु रामचंद्रांच्या चरणी सदैव लीन रहाणाऱ्या मारुतीच्या जन्माचा इतिहास, हनुमान जयंती पूजाविधी आणि मारुतीच्या उपासनेमागील शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून जाणून घेऊया.

जन्माचा इतिहास : राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी ‘पुत्रकामेष्टी यज्ञ’ केला. तेव्हा यज्ञातून अग्निदेव प्रगट होऊन त्याने दशरथाच्या राण्यांसाठी पायस (खीर, यज्ञातील अवशिष्ट प्रसाद) प्रदान केला होता. दशरथाच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणाऱ्या अंजनीलाही पायस मिळाले होते आणि त्यामुळेच मारुतीचा जन्म झाला होता. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. तो दिवस ‘हनुमान जयंती’ म्हणून साजरा करतात.

मारुतीला ‘हनुमान’ हे नाव कसे पडले ? : जन्म झाल्यावर ‘उगवणारे सूर्यबिंब हे एखादे पक्व फळ असावे’, या समजुतीने हनुमानाने आकाशात उड्डाण करून त्याकडे झेप घेतली. त्या दिवशी पर्वतिथी असल्यामुळे सूर्याला गिळण्यासाठी राहु आला होता. सूर्याकडे झेपावणारा हनुमान हा दुसरा राहुच आहे, या समजुतीने इंद्राने त्याच्यावर वज्र फेकले. ते हनुवटीला लागून ती छाटली गेली. यावरून त्याला ‘हनुमान’ हे नाव पडले.

हनुमान जयंती पूजाविधी : यादिवशी प्रातःकाळी सूर्योदयाच्या वेळी हनुमानाचा जन्मोत्सव साजरा करतात. हनुमंताच्या मूर्तीचे किंवा प्रतिमेचे आपल्याला शक्य होईल त्याप्रमाणे पंचोपचार किंवा षोडशोपचार पूजन करावे. सूर्योदयाच्या वेळी शंखनाद करून पूजनाला प्रारंभ करावा. नैवेद्याला सुंठवडा (सुंठीचे आणि साखरेचे एकत्रित मिश्रण) ठेवू शकतो. त्यानंतर तो सर्वांना प्रसाद म्हणून वाटावा. हनुमानासाठी रुईच्या पानांचा आणि फुलांचा हार करावा. पूजनानंतर श्रीरामाची आणि हनुमंताची आरती करावी.

मारुतीच्या उपासनेअंतर्गत करायच्या कृती : शेंदूर, रुईची पाने आणि फुले, तसेच तिळाचे तेल यांमध्ये हनुमानाची पवित्रके आकर्षित करण्याची क्षमता सर्वांत जास्त असल्याने या वस्तू हनुमानाला अर्पण कराव्यात. पंचतत्त्वांवर हनुमानाचे अधिपत्य असल्याचे प्रतीक म्हणून, हनुमानाला फुले




वहातांना तसेच हनुमानाच्या देवळात दर्शन घेतल्यानंतर प्रदक्षिणा घालतांना पाच किंवा पाचच्या पटीत असाव्या.

मारुतीला नारळ अर्पण करण्याची पद्धत : हनुमानाला नारळ अर्पण करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. नारळ अर्पण करण्यापूर्वी हनुमानाच्या मूर्तीसमोर नारळाची शेंडी मूर्तीकडे करून नारळ हातात धरावा. हनुमानाची सात्त्विक स्पंदने नारळात येण्यासाठी हनुमानाला प्रार्थना करावी. त्यानंतर नारळ फोडून त्याचा अर्धा भाग आपल्यासाठी ठेवावा आणि राहिलेला अर्धा भाग तेथील स्थानदेवतेला अर्पण करावा.

आध्यात्मिक त्रास आणि ग्रहपीडा निवारणार्थ मारुतीची उपासना : ग्रहपीडा, शनीची साडेसाती दूर करण्यासाठी, आसुरी शक्तींपासून आणि आध्यात्मिक त्रासापासून रक्षण होण्यासाठी हनुमानाची उपासना सांगितली आहे.

नामजप आणि स्तोत्रपठण : हनुमान जयंतीच्या दिवशी वातावरणातील हनुमानतत्त्व नेहमीपेक्षा १००० पटीने अधिक कार्यरत असते. त्याचा आध्यात्मिक लाभ घेण्यासाठी त्या दिवशी मारुतीचा ‘श्री हनुमते नमः ।’ हा जप अधिकाधिक करावा. समर्थ रामदासस्वामींनी रचलेले मारुतिस्तोत्र (भीमरूपीस्तोत्र) म्हणावे. नियमित स्तोत्रपठण केल्याने पठण करणाऱ्या व्यक्तीभोवती सूक्ष्म स्तरावरील संरक्षककवच निर्माण होऊन तिचे अनिष्ट शक्तींपासून रक्षण होते. तसेच रामदासस्वामी यांनी रचलेली मारुतीची (हनुमंताची) चैतन्याने ओतप्रोत भरलेली आरती म्हणावी, त्याने भक्तिभाव निर्माण होतो.

बलोपासना करून हनुमंताची कृपा संपाद करूया!

धर्म-अधर्म यांच्या लढ्यातील महत्त्वाचे दैवत म्हणजे हनुमंत ! हनुमंताने त्रेतायुगात रावणाविरुद्धच्या युद्धात प्रभु श्रीरामास सहकार्य केले, तर द्वापारयुगात महाभारताच्या घनघोर युद्धात तो कृष्णार्जुनाच्या रथावर विराजमान होता. हिंदुस्थानात मोगली सत्ता अत्याचाराचे थैमान घालत होत्या, त्या वेळी महाराष्ट्रात बलोपासना रुजवण्यासाठी समर्थ रामदासस्वामींनी हनुमंताच्या मूर्तींची ११ ठिकाणी स्थापना केली आणि हिंदूंमध्ये ‘हिंदवी स्वराज्या’च्या स्थापनेचे स्फुल्लिंग चेतवले. त्यामुळे हनुमानजयंतीच्या पार्श्वभूमीवर बलोपासनेसह भगवंताची भक्ती करण्याचा संकल्प करूया.

हनुमंतास प्रार्थना : हनुमान जयंतीच्या निमित्ताने आपण मारुतीरायाच्या चरणी शरण जाऊन प्रार्थना करूया की, हे मारुतिराया, तू जशी श्रीरामचंद्राची भक्ती केलीस, तशी भक्ती मलाही करण्यास शिकव. धर्मरक्षणासाठी मला भक्ती आणि शक्ती दे, ही तुझ्या चरणी प्रार्थना आहे.

**संदर्भ : सनातन संस्थेचा लघुग्रंथ ‘मारुति’**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# ज्ञान, शक्ती, भक्ती, ऊर्जा व बुध्दिमत्तेचा अथांग सागर महाबली हनुमान

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत.हनुमान जन्मोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते.चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोस्तव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जन्मोत्सव साजरा केल्या जाते.भगवान प्रभु रामचंद्र विष्णुचे अवतार आहे तर महाबली हनुमान शंकरजींचा अवतार आहे.मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते.भारतात हनुमान जन्मोत्सवाला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते.महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुनांचा मोठा भंडार होता.त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी व राजनितीज्ञ होता. परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मर्यादांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली. परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला. कारण हनुमान रामाचे दुत म्हणून रावण दरबारी गेले होते. त्यामुळे हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपल्या रामभक्तीचे, ज्ञानाचे व शक्ती प्रदर्शन केले. कारण रामाचे संकट म्हणजे स्वतःचे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते.कारण राम, लक्षण,सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते.तीच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते. मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या पटांगणामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते.कारण गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वतः वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो किंवा शुभ प्रसंग अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुखःशांती निर्माण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते.श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले.कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. याप्रमाणे ‘‘सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय‘‘ म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो.सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी वानरसेनेणे आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दील्या.यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या.त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवीले.अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतीत्थाने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला.परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली. सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम-सीता नाही त्याचा मला काय उपयोग?मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या ह्रदयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले.हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार?यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या,जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले! तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते, रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते.हनुमान जन्मोत्सवाला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील बदलत्या हवामानामुळे वाढते प्रदुषण रोखण्यासाठी व प्राणवायूची मात्रा वाढवीण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.कारण युद्धजन्य परिस्थिती व वाढते औद्योगिकीकरण यांमुळे सर्वत्र वातावरण प्रदूषित होत आहे.करीता वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल. सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक्व नाही.महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे. यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल.हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार, बेरोजगारी ,भुकमरी, कुपोषण, शैक्षणिक समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे.असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवीणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ.कारण मुठभर राजकीय पुढाऱ्यांच्या भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो.आज हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल.असे जर झाले तर प्रत्येक झाडात,पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल.कारण महाबली हनुमान नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे.जय हनुमान. एक मुखाने बोला;जय जय हनुमान

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## भारतीय जैन संघटनेचा सेवायज्ञ; २८८ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

# ५१ जणांचे रक्तदान; १५५ जणांची नेत्र तर ८२ जणांची कर्करोग तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** अहिंसा परमो धर्म आणि सेवा हाच खरा धर्म असल्याचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवाचे औचित्य साधून भारतीय जैन संघटनेच्या जालना शाखेच्यावतीने आयोजित आरोग्य शिबिरास जालनेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मंगळवारी (३१ मार्च) गुरु गणेश तपोधाम परिसरात पार पडलेल्या या शिबिरात एकूण २८८ नागरिकांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन महावीर स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा, जैन मूर्तीपूजक श्रीसंघाचे अशोक बिनायकिया, उत्तमचंद बनवट, तेरापंथ समाजाचे ॲड. अनिल संचेती, दिगंबर जैन समाजाचे संजय लव्हाडे आणि भारतीय महिला जैन संघटनेच्या अध्यक्षा सरिता कुचेरिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी जालना महापालिकेचे उपमहापौर राजेश राऊत आणि नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी शिबिरास भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी संयोजक राजेश लुनिया, विजय जैन, डॉ. गिरीश पाकणीकर, अरुण मित्तल, संजय मुथा, डॉ. धरमचंद गादिया, विजय सुराणा, अतुल लड्डा, महावीर गिल्डा, अशोक जोगड, नरेंद्र जोगड, भरत गादिया, दर्पण सकलेचा, महावीर रुणवाल, सीए गोपाल अग्रवाल, हेमंत ठक्कर, अनिल सोनी, वीरेंद्र रुणवाल, गौतम श्रीश्रीमाल, रोहित भुरेवाल, विनोद बंब, विजय मुथा, जालना ब्लड बँकेचे गणेश चौधरी, मुन्ना गादिया, कांतीलाल सेठीया, स्मिता आबड, सपना लुनिया, सरोज समदरीया आदींची उपस्थिती होती.

### जिओ और जिने दो हा संदेश कृतीत उतरवणे हीच खरी मानवसेवा - सकलेचा

यावेळी बोलताना सुदेश सकलेचा म्हणाले की, भगवान महावीर स्वामींनी जगाला दिलेला जिओ और जिने दो हा संदेश केवळ शब्दांपुरता मर्यादित न ठेवता, तो कृतीत उतरवणे हीच खरी मानवसेवा आहे. भारतीय जैन संघटनेने जयंतीच्या निमित्ताने आरोग्य शिबिराचे आयोजन करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो अत्यंत कौतुकास्पद आहे. उत्सवाच्या आनंदासोबतच गरजूंना आरोग्य सेवा मिळवून देणे, हीच महावीर स्वामींना खरी आदरांजली ठरेल. अशा सामाजिक उपक्रमांमुळेच समाजात एकतेची आणि सेवेची भावना अधिक प्रबळ होते, असे ते म्हणाले.

यावेळी बोलताना संयोजक राजेश लुणिया म्हणाले की, भगवान महावीरांच्या जयंतीनिमित्त समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जालनेकरांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल आम्ही ऋणी आहोत.

या शिबिरातआधुनिक तंत्रज्ञानाचा वापर विरा मेडीसिटी कार्किनोस कॅन्सर सेंटरच्यावतीने व्हिएल स्कोपद्वारे मुख कर्करोग, ब्रेस्ट स्कॅनद्वारे स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग अशा एकूण ८२ जणांची मोफत तपासणी करण्यात आली.

लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे १५५ रुग्णांची नेत्र तपासणी झाली. यापैकी मोतीबिंदूचे निदान झालेल्या १२ रुग्णांवर जालना येथील लायन्स नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

जालना ब्लड बँकेच्या सहकार्याने पार पडलेल्या या उपक्रमात ५१ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी संघटनेचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि डॉक्टरांच्या पथकाने परिश्रम घेतले



# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी २ ते ८ एप्रिलदरम्यान 'महा-साधना सप्ताह'!

भारत सरकार, क्षमता विकास आयोग () आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा-साधना सप्ताह २ ते ८ एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत ८ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास ३५ लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग, आणि ६ विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी

साधना सप्ताह हा कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम चा एक भाग असून शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी आयोजित केला जातो. एक आठवडाभर आयोजित केला जाणारा हा उपक्रम पूर्णपणे ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वत:च्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे,वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केले आहे.

महा-साधना सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे द्वारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येईल. अधिकारी आणि कर्मचारी आपले काम सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करणार असल्याने कामकाजावर परिणाम न होता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कौशल्यवृध्दी होण्यास मदत होईल.या अभ्यासक्रमांमुळे प्रत्येकाला स्वत:ची क्षमता ओळखून त्यानुसार कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते.

महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत

बदलत्या काळाशी सुसंगत राहण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या शासकीय कामकाजात सुद्धा विविध डिजिटल प्रणाली, ॲप्सचा वापर होत आहे. महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात वापर, नागरिक केंद्रित सेवा आणि पारदर्शकता वाढविण्यास या सप्ताहाची मदत होणार आहे.

या सप्ताहाच्या अनुषंगाने राज्यातील विविध शासकीय कार्यालये. जिल्हा कार्यालये यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान ४ तास असणे अनिवार्य आहे. सर्व अभ्यासक्रम २ ते ८ एप्रिल दरम्यान पूर्ण करणे गरजेचे असून कर्मयोगी भारत पोर्टलवर सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी नोंदणी आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (या विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये) तसेच विभागीय आयुक्त (विभागीय आयुक्त कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हापरिषदा) या सर्वांनी साधना सप्ताहात एकूण ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे राहील.

विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या () पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या '-वारी २.0' मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**वर्षा फडके - आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**




# जालन्यात ८ एप्रिलपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचा जागर

## कन्हैयाकुमार, नितीन चंदनशिवे यांच्यासह मान्यवरांची राहणार उपस्थिती



**जालना । प्रतिनिधी -** सुवर्णमहोत्सवी वर्षाकडे दिमाखदार वाटचाल करणाऱ्या जालन्यातील ऐतिहासिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेस येत्या ८ एप्रिल २०२६ पासून सुरुवात होत आहे. या व्याख्यानमालेत देशपातळीवरील विद्यार्थी नेते कन्हैयाकुमार, विचारवंत नितीन चंदनशिवे, डॉ. रतनलाल, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तोकले आणि शमिभा पाटील आपले विचार मांडणार आहेत. व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ. शांताराम रायपुरे आणि सचिव सुधाकर रत्नपारखे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

अंबड रोडवरील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर ८ ते १३ एप्रिल दरम्यान सायंकाळी ७ वाजता हे सत्र पार पडणार आहे. यंदा या व्याख्यानमालेचे ४९ वे वर्ष आहे. महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार तळागाळापर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने गेल्या ४८ वर्षांपासून अविरतपणे हा ज्ञानयज्ञ सुरू आहे.

व्याख्यानमालेचे सविस्तर नियोजन:

८ एप्रिल (उद्घाटन): आमदार अर्जुनराव खोतकर व उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते उद्घाटन. कोल्हापूरचे विचारवंत नितीन चंदनशिवे आंबेडकरी चळवळ व आजचा तरुण या विषयावर पहिले पुष्प गुंफतील. अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे असतील.

९ एप्रिल: विद्यार्थी नेते कन्हैयाकुमार भारतीय लोकतंत्र के सामने की चुनौतिया या विषयावर विचार मांडतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक नेते ॲड. ब्रम्हानंद चव्हाण असतील.

१० एप्रिल: दिल्लीचे प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ डॉ. रतनलाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती के मायने या विषयावर व्याख्यान देतील. अध्यक्षस्थानी ॲड. शिवाजी आदमाने असतील.

११ एप्रिल: ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तोकले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांसाठीचे योगदान या विषयावर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी वंदना मगरे असतील.

१२ एप्रिल: जळगावच्या सामाजिक कार्यकर्त्या शमिभा पाटील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आपली जबाबदारी या विषयावर पुष्प गुंफतील. अध्यक्षस्थानी सुधाकरराव रत्नपारखे असतील.

१३ एप्रिल (अभिवादन सभा): पुणे येथील राखी चौरे यांचा भीमाची वाघीण हा भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते ॲड. बी. एम. साळवे असतील. आगामी कार्यक्रमास माजी आमदार राजेश टोपे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, कार्याध्यक्ष साईनाथ चिन्नदोरे, प्राचार्य डॉ. दयानंद भक्त, डॉ. विजय कुमठेकर, ॲड. सिद्धार्थ चव्हाण, उत्सव समितीचे अध्यक्ष कपिल खरात, शरद मांगधरे, जीवन खंडागळे यांसह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आवाहनः ''परिवर्तनवादी विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या या व्याख्यानमालेत जालना शहर व जिल्ह्यातील नागरिक, युवक, युवती आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,'' असे आवाहन डॉ. शांताराम रायपुरे व सुधाकर रत्नपारखे यांनी केले आहे.

---

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी

## रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असून आरोग्य सुविधा सक्षम करण्यावर भर द्या - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जिल्हा सामान्य रुग्णालयाला अचानक भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेटी देऊन तेथील कामकाजाचा आणि आरोग्य सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रामुख्याने बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), अपघात विभाग, एक्स रे विभाग आणि स्वच्छता व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांशी तसेच रुग्णांशी थेट संवाद साधून त्यांना मिळणारे उपचार, औषध उपलब्धता आणि भोजनाचा दर्जा याबाबत विचारपूस केली. रुग्णालयातील सुविधा व स्वच्छतेबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले, मात्र काही त्रुटी दूर करण्याचे निर्देशही दिले. यावेळी त्यांनी डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना सूचना देताना सांगितले की, रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि वेळेवर उपचार मिळवून द्यावेत. रुग्णांच्या सेवेसाठी प्रशासन तत्पर असून आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे, असेही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्पष्ट केले.




---

## पाणी सोडण्याची विनंती केली म्हणून ग्रामपंचायत कर्मचाऱ्याची ग्रामस्थांना धमकी

### संतप्त गावकऱ्यांचे तहसीलदारांना दिले निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** एकीकडे तीव्र उन्हाळ्याच्या झळा बसत असताना, दुसरीकडे ग्रामीण भागात पाणी पुरवठ्यावरून वाद पेटू लागले आहेत. घनसावंगी तालुक्यातील राहेरा / तनवाडी येथील ग्रामपंचायत कर्मचाऱ्याने पाणी मागणाऱ्या ग्रामस्थांना अरेरावीची भाषा वापरत थेट ''काय करायचे ते करा'' अशी धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी संबंधित कर्मचाऱ्याची हकालपट्टी करावी, या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे.

नेमकी घटना काय?

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या गावात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. हक्काचे पाणी मिळावे यासाठी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या संबंधित कर्मचाऱ्याकडे पाणी सोडण्याची विनंती केली होती. मात्र, पाणी सोडण्याऐवजी सदर कर्मचारी आणि त्याच्या वडिलांनी ग्रामस्थांना उद्धटपणे वागणूक दिली. ''तुम्हास काय करता येईल ते करा, आम्ही कशासही समर्थ आहोत,'' अशा शब्दांत त्यांनी ग्रामस्थांना धमकावल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

करांचा भरणा करूनही सुविधांचा अभाव

गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, आम्ही ग्रामपंचायतीला वेळोवेळी घरपट्टी आणि पाणीपट्टीचा भरणा करतो. असे असतानाही प्रशासनाकडून कोणतीही मूलभूत सुविधा पुरवली जात नाही. एकीकडे पाणी नाही आणि दुसरीकडे मागणी केल्यास धमकी दिली जाते, अशा दुहेरी संकटामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गावकऱ्यांच्या प्रमुख मागण्या:

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने गावात येऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी व पंचनामा करावा.

ग्रामस्थांना धमकावणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ कामावरून कमी करण्यात यावे.

गावासाठी नियमित पाणी पुरवठ्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

येथे पाठवली निवेदने

या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी जालना, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. जालना), गटविकास अधिकारी (घनसावंगी) आणि सरपंच/ग्रामपंचायत कार्यालय यांना निवेदनाच्या प्रती सादर केल्या आहेत.

या निवेदनावर भरत गिराम , सोपान गायकवाड, शिवाजी यादव, संतोष शेळके, शिवनाथ गायकवाड, विक्रम यादव, निवृत्ती पवार, गोविंद गिराम, विठ्ठल यादव, रमेश शेळके, रामभाऊ दाते, रामदास कोतकर, दत्तात्रय दांडगे, कचरू कांबळे , यांच्यासह सुमारे १४ हून अधिक प्रमुख ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने यावर तातडीने कारवाई न केल्यास आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशाराही गावकऱ्यांनी दिला आहे.

---

### जिल्हा प्रशासनाचे आवाहन

## विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता नागरिकांनी दक्षता घ्यावी

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांच्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. १ ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता वर्तविली आहे. तरी दि. २ व ३ एप्रिल रोजी ऑरेंज अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. १ व ४ एप्रिल रोजी यलो अलर्ट जारी केला असून तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी वादळी वारे, विजेपासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, विज चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहु नये. विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व विज चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल यांच्यापासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजाचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या, लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीज चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमिनीशी कमीतकमी संपर्क असावा. शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी किंवा झाकून ठेवावी. आपत्कालीन परिस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकच्या तहसील कार्यालयात, पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

---

## डॉ. गोविंद भताने यांनी राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांची घेतली भेट



**नवी दिल्ली -** महाराष्ट्र राज्याचे नवनियुक्त राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांची दिल्ली येथील महाराष्ट्र सदनमध्ये त्यांच्या दिल्ली दौऱ्यादरम्यान डॉ. गोविंद भताने (संचालक, डॉ. भतानेस् छाया फाउंडेशन व प्रदेश समन्वयक, भाजपा वैद्यकीय आघाडी, महाराष्ट्र) यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. भताने यांनी छाया फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांची सविस्तर माहिती राज्यपाल महोदयांना दिली. तसेच, महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. यावेळी डॉ. भताने यांनी महाराष्ट्र लोक भवन येथे आगामी सामाजिक व आरोग्यविषयक कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात राज्यपाल महोदयांना निवेदन सादर केले. राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांनी छाया फाउंडेशनद्वारे सुरू असलेल्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, त्यांनी डॉ. भताने यांना महाराष्ट्र लोक भवन येथे भेट देण्याचे आमंत्रण दिले.

---

## पर्यावरण आधी, मंजुरी नंतर? सर्वोच्च न्यायालयाची तीव्र चिंता

**जालना -** प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर त्याला कार्योत्तर (पोस्ट-फॅक्टो) पर्यावरण मंजुरी देण्याच्या प्रथेवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. अशा मंजुरींमुळे पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक असलेले प्रकल्प केवळ सरकारी हस्तक्षेपाची वाट पाहत सुरूच राहतील, अशी भीती सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठाने व्यक्त केली. जर कायद्यानुसार पूर्वपरवानगी अनिवार्य असेल, तर परवानगीशिवाय सुरू असलेले कोणतेही काम थांबवणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य ठरते, याउलट कार्योत्तर मंजुरीची सोय ठेवल्यास कायदाच ठरतो, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी यातील धोका स्पष्ट केला. ते म्हणाले, ''कायदे सर्वांसाठी समान बनवले जातात, पण त्यांची अंमलबजावणी समान रीतीने होत नाही. जर पूर्वपरवानगीची अट शिथिल केली, तर अनधिकृत प्रकल्प तोपर्यंत सुरूच राहतील, जोपर्यंत सरकार स्वतःहून हस्तक्षेप करून ते बंद करत नाही. याउलट, पूर्वपरवानगी बंधनकारक असेल, तर परवानगीशिवाय एक वीटही रचली जाऊ शकत नाही.'' केंद्र किंवा राज्य सरकार आपल्याला पर्यावरण मंजुरीची माहिती नव्हती, असा युक्तिवाद करू शकत नाही, अशा शब्दांत त्यांनी सरकारलाही सुनावले. या गंभीर विषयावर बोलताना नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी न्यायालयाच्या भूमिकेचे समर्थन केले. ॲड. धन्नावत म्हणाले, ''पर्यावरणाचे संरक्षण हा केवळ कायद्याचा प्रश्न नाही, तर तो भावी पिढ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. आधी प्रदूषण करा आणि नंतर दंड भरा ही संकल्पनाच मुळात चुकीची आणि धोकादायक आहे. ज्याप्रमाणे नागरिकांनी न्यायाधीशांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे गैर आहे, त्याचप्रमाणे विकासकांनी कायद्यातील पळवाटा शोधून पर्यावरणाचे नियम मोडणे हे सुद्धा गंभीर आहे. पूर्वपरवानगीची अट ही पर्यावरणाचे संभाव्य नुकसान आधीच ओळखण्यासाठी आणि ते टाळण्यासाठी असते. कार्योत्तर मंजुरी देऊन आपण बेकायदेशीर कामांना एक प्रकारे कायदेशीर मान्यता देतो, जे पूर्णपणे चुकीचे आहे.'' केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी बाजू मांडताना सांगितले की, कार्योत्तर मंजुरीचा उद्देश नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना नियमित करणे नसून, जे प्रकल्प पर्यावरण मूल्यांकन प्रक्रियेच्या बाहेर आहेत, त्यांना तज्ज्ञ समितीच्या छाननीखाली आणणे आहे. अशा प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई आणि आवश्यक असल्यास प्रकल्प बंद करण्याची तरतूद असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सृष्टी अग्निहोत्री यांनी युक्तिवाद केला की, कार्योत्तर मंजुरीला सरसकट परवानगी दिल्यास परवानगी घेण्यापेक्षा क्षमा मागणे सोपे ही प्रवृत्ती वाढेल आणि त्यामुळे पर्यावरण मूल्यांकन कायद्याचा मूळ हेतूच नष्ट होईल. या प्रकरणाची पुढील सुनावणी पुढच्या आठवड्यात होणार आहे.

---

## कृष्णा कदम यांच्या कवितेला राज्यस्तरीय पुरस्कार



**जालना । प्रतिनिधी -** अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे कार्यरत असलेले प्रा. कृष्णा कदम यांच्या पावसाने उजळतील आयुष्याची पाने या कवितेस अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत, साहित्य भारती महाराष्ट्र प्रदेश व श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्योत्सवातील (जागर प्रतिभेचा- युवा मनाचा) काव्य लेखन स्पर्धेत खुल्या गटातील प्रथम क्रमांकाचा(५००० ₹) राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. या यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, सचिव मनिषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सह प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर यांनी अभिनंदन केले. अंकुशराव टोपे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या हस्ते शाल व बुके देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे,पर्यवेक्षक प्रा.रामप्रसाद भालेकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भुजंग डावकर डॉ.पंडित रानमाळ, रामदास वैद्य,डॉ. कार्तिक गावंडे, डॉ.अर्जुन जाधव, कार्यालयीन अधीक्षक सुरेश ठेंग, सुरेश चव्हाण,डॉ. संतोष करवंदे , अविनाश भालेराव,डॉ.शंकर तिकांडे, डॉ.विजय कुमठेकर, ज्ञानेश्वर कळकटे, मकरंद चौबे, ज्ञानेश्वर नागवे,किशोर साळवे, कारके यांच्या सह महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापकांनी कृष्णा कदम यांचे अभिनंदन केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.